महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, पुणे-४११००५

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY &HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE DIVISIONAL BOARD , PUNE - 411005

| DIVISIONAL CHAIRMAN<br>25536722 (OFF) | DIVISIONAL SECRETARY<br>25536781/82/83 /<br>25536712(OFF) | FAX- 020/25536761<br>E-MAIL - sscboardpune@gmail.com<br>Website- www.sscboardpune.in |
|---|---|---|

क्रमांक पुविमं/शाखा ब/ 878
पुणे-४११००५
दिनांक- ०७/०१/२०२५
90

प्रति,

प्राचार्य,
पुणे, अहिल्यानगर व सोलापूर

विषय:- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०२५ ( इ.१२ वी ) उत्तरपत्रिकांच्या परीक्षण व नियमनाबाबत...

संदर्भ:- क्र.रा.मं./परीक्षा-२/३३४ दिनांक २७/०१/२०२५

वरील विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु/मार्च २०२५ साठी आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना नेमणूक करण्यात आलेली आहे. सदर नेमणुकीच्या अनुषंगाने परीक्षण/नियमनाचे काम दिलेल्या शिक्षकांना शालेय कामकाजातून सुट दिल्यास उत्तरपत्रिका तपासणीचे काम वेळेत पुर्ण होऊन निकाल वेळेत लावणे शक्य होईल.

याबाबत कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, तपासलेल्या उत्तरपत्रिका कार्यालयात/संकलन केंद्रावर जमा करतांना सदर उत्तरपत्रिकांचे काऊंटर फॉईल्स (counter foils) फाडूनच उत्तरपत्रिका जमा करणे अपेक्षित असतांना बरेचसे नियामक उत्तरपत्रिकांचे काऊंटर फॉईल्स (counter foils) न फाडता उत्तरपत्रिका कार्यालयात जमा करतात. त्यामुळे त्याचा विपरीत परिणाम निकाल प्रक्रियेवर होत असून मा. न्यायालयाच्या निर्देशानुसार निकाल वेळेत लावण्यात मंडळास अडचणी येतात.

तरी याबाबत आपणांस सूचित करण्यात येते की, परीक्षण/नियमनाचे काम दिलेल्या शिक्षकांना शालेय कामकाजातून सूट देऊन उत्तरपत्रिका तपासणीचे काम प्रथम प्राध्यन्याने करण्यात यावे. कार्यालयात / संकलन केंद्रावर तपासलेल्या उत्तरपत्रिका जमा करतांना सदर उत्तरपत्रिकांचे काऊंटर फॉईल्स (counter foils) फाडूनच उत्तरपत्रिका जमा करण्याबाबत नियामकांना आपल्या स्तरावरुन आदेशित करावे तसेच उत्तरपत्रिकांचे काऊंटर फॉईल्स (counter foils) फाडण्यासाठी संबंधित नियामकांना अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करुन दयावे.

उत्तरपत्रिकांचे काऊंटर फॉईल्स (counter foils) फाडलेले नसल्यास अशा उत्तरपत्रिका स्विकारल्या जाणार नाहीत व त्यामुळे विद्यार्थ्यांचा निकाल वेळेवर लागला नाही तर याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील याची जाणीव आपण संबंधित नियामकांना करुन दयावी.

(औदुंबर उकिरडे)
विभागीय सचिव
पुणे विभागीय मंडळ,
पुणे-४११००५